# जगातील दुःख व आक्रोश तुम्हाला दिसत नसतील, अैकू येत नसतील तर देवाने दिलेली इंद्रिये व्यर्थ आहेत.

**— आचार्य भिसे**

( हिंगणघाट येथे १२ जुलैला ग्रामदान पदयात्रेसाठी आलेल्या कॉमर्स कॉलेज आणि बी. टी. कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोरील भाषण.)

युरोपात 'सर्व्हायव्हल ऑफ दि फीटेस्ट' सर्वोत्तमच जगतील असा सिद्धांत डार्वीनने मांडला. त्याचा फार चुकीचा अर्थ लावण्यात आला आणि त्यामुळे जगावर दुःख परंपरा कोसळली. आणि सामान्य मानव समाजाला फार सहन करावे लागले.

भारतातील वेदांचा मात्र निराळाच आदेश आहे–उत्तिष्ठ, जाग्रत प्राप्य वरान् निबोधत ! असे सांगितले आहे. आमची संस्कृति ही समन्वय संस्कृति आहे. काही लोक शापित आणि काही वरप्राप्त अशी आमची रचना नाही. पिढ्यान् पिढ्या पापे भोगावी लागतील असे नाही तर पश्चात्ताप होताच जीवन उठते. डार्विनच्या सिद्धांताने मात्र आपत्ति निर्माण झाल्या.

रस्किन हा युरोपात दुसरा विचारवंत होऊन गेला. त्याचे Unto this last पुस्तक वाचून गांधीजींनीं त्याला सर्वोदय हे नाव दिले. मानवाचा केवळ भौतिकच नव्हे तर सर्वांगिण व सर्वकालिक विकास असा त्यांनी विचार मांडला.

ह्या विचाराची पताका खांद्यावर घेऊन जगात अनेक लोक निघाले आहेत. भारतात त्याचे प्रयोग चालले आहेत. गांधीजींनी त्या विचारांना व्यवहारात आणले, विनोबांनी त्यांचा वारसा घेतला. विनोबांनी जन्माने–परिस्थितीने जे श्रेष्ठ त्यांना आवाहन केले. ईश्वरीप्रेरणेने त्यांनी पोचमपल्ली-पासून कार्याला प्रारंभ केला. जगाचें दुःख व आक्रोश आम्हाला दिसत नसतील, अैकू येत नसतील तर देवाने दिलेली इंद्रिये व्यर्थ आहेत.

मालकी हक्क म्हणजे सात्त्विक विचारांची प्रतारणाच होय. मातेची विक्री शोभत नाही. नगरहवेली–राज्यात जमीन व्यक्तीच्या मालकीची नसते. ती गावकीची असते. पण इंग्रजांना वसुल हवा म्हणून त्याने मालकी दिली, मधे दलाल उभे केले. त्यातून सरंजामशाही जन्माला आली. मालकी हक्क मानवी हक्काच्या विरुद्ध आहे. जमीनीवरच लक्ष अधिक का तर सबंध जीवनाचा तो आधार आहे. मालकी हक्काचे विसर्जन हा सिद्धांत सर्वच क्षेत्रात लागू करायचा आहे आज देशाची अन्नधान्य परिस्थिति अत्यंत कठीण आहे. पुढील दोन महिन्यात काय होईल हे सांगता येत नाही. इतकी ती स्फोटक आहे. माझे मित्र श्री. हरिश्चंद्र पाटील जपानमध्ये जाऊन आले आणि त्यांनी तेथील अनुभवाच्या आधाराने जपानी भातशेतीचे उत्तम प्रयोग भारतात केले. पंडित नेहरूजींनी त्यांचे अनुभव अैकण्यासाठी त्यांना दिल्लीला बोलाविले. केंद्र सरकारचे दिल्लीतील प्रसिद्ध शेतकी तज्ञ बैठकीला उपस्थित होते. ते म्हणाले 'हे आम्हाला सर्व माहित होते; आम्हाला ह्यात नवीन काहीच नाही. तेव्हा नेहरू संतापले. ते म्हणाले 'तुम्हाला हे सर्व माहित होते तर मग दरवर्षी परदेशातून धान्य आणण्यासाठी जे अब्जावधि रुपये खर्च झाले, वरून आणि मानहानी सोसावी लागली तेव्हा तुम्ही काय करीत होते." तुमची डोकी फोडायला पाहिजेत नेहरू रागाने तेव्हा बोलले पण अजून कोणाची डोकी फुटली नाहीत किंवा देशाची धान्य परिस्थिति बदलली नाही. अशी देशाची परिस्थिति आहे ती आमूलाग्र बदलायची आहे.

त्यासाठी बाल जीवनापासूनच संस्कार करावे लागतील. त्यासाठी विनोबा म्हणतात सर्वोदयपात्र ठेवा; त्याच्याजवळ सत्पुरुषाचा फोटो ठेवा. बालकांना त्याला नमस्कार करायला सांगा. व घरांतल्या सर्वात चिमुकल्या मुलाच्या हातून मूठभर धान्य सर्वोदय पात्रात अर्पण करा.

तुम्हा तरुणांच्या खांद्यावर ही सर्वोदयाची पताका आहे. ही मानवतेची पताका आहे. काही चांगली कामे आपण आपल्या जीवनात करतो. पण निर्धाराने, सातत्याने, निकड बाळगून काम करा. त्यावेळी आम्ही प्रतिज्ञा करीत होतो की देशासाठी काहीतरी आणि चांगल्यां घराण्यातल्या भगिनी दारूच्या गुत्त्यासमोर उभ्या रहायच्या. तेव्हा अंतःकरणात अशी अेखादी चांगली प्रतिज्ञा करा. आणि अेकेकाचे अंतःकरण पॉवर हाऊस बनू द्या.

---०---

## हिंगणघाट तालुका ग्रामदान शिबिर

दुपारी दोन वाजता हिंगणघाटच्या टाऊनहॉलमध्ये शिबिराला शाहीर दत्ता पवार ह्यांच्या गीताने झाली. स्वागताचे भाषण एम्. एल्. ए. हिंगणघाटचे नगराध्यक्ष श्री. विनायकराव चौधरी ह्यांनी केले. अध्यक्षस्थानी विदर्भ हरिजन सेवक संघाचे मंत्री श्री. वेलसरे वकील होते.

शांतिसेना विषयावर श्री. माणिकचंदजी दोशी बोलतांना म्हणाले 'मनात ग्रह ठेवले तर सत्यदर्शन होण्याला बाधा निर्माण होते आणि आपलाच आग्रह धरला तर जगाचे सहकार्य लाभत नाही. आणि मग अशांति निर्माण होते.

'शेजारच्या देशाशी लढा असला म्हणजे अंतर्गत शांतीचे फार महत्व असते. त्यादृष्टीने शांतिसेनेची देशाला आज फार मोठी गरज आहे.'

श्री. शेंदुर्णीकर वकील म्हणाले 'चीनचे लष्करी आक्रमण सेनेने थोपवून धरता येईल. परंतु वैचारिक आक्रमणाला तोंड ग्रामदानाने च दिले जाईल. कारण ग्रामदानाने प्रत्येक गाव किल्ला बनतो.'

श्री. वंग म्हणाले—'लष्करी आक्रमणासमोरहि शांतिसेना अहिंसकसेना बनून काम देईल. भारताने बलाढ्य इंग्रजापासून असेच स्वातंत्र्य प्राप्त केले. लष्कर हेच जर न्याय मिळविण्याचे साधन बनलें तर मग सिलोन सारख्या लहानशा देशांना जगात काहीच भविष्य उरणार नाही. जगात शांतिसेनेचे संघटन उदयाला येत आहे, प्रमुख पुढारी लोक आघाडीवर असले तर त्यांना तुडवित कोणत्याहि राष्ट्राच्या सेना पुढे जाऊ शकणार नाही.'

ग्रामदानाचा विषय श्री. आर्. के. पाटील ह्यांनी मांडला.

जुने ग्रामदान आणि आजचे सुलभ ग्रामदान ह्यातील फरक त्यांनी समजावून दिला. ते म्हणाले 'जुनी ग्रामदाने आदिवासी भागातच जास्त होती. परंतु सुलभ ग्रामदनामुळे ती आता कोठेहि होऊ शकतात. ह्या सुलभ ग्रामदानाने गाव अेकवटेल, पंचवार्षिक योजनांत राहिलेल्या उणीवांची पूर्ति होईल, चीनच्या आव्हानाला उत्तर देता येईल.'

'तुकडे पडतील असा आक्षेप आहे तो बरोबर नाही. मोठे शेतकरी सलग तुकडा देतील आणि मध्यम व लहान लोक त्यांच्या हिस्यावर येणाऱ्या जमिनीची किंमत देऊन त्यातून अेक सलग शेत विकत घेऊन देतील.'

आजच्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत व ग्रामदानी ग्रामसभेतील फरक समजावून सांगतांना पाटील साहेब म्हणाले "आजच्या ग्रामपंचायतीच्या कायद्यानुसार ग्रामसभा वर्षातून दोनदा बसते आणि पंचायतीच्या सदस्याना सल्ला देते. तो सल्ला त्यांना बंधनकारक असत नाही. ग्रामदानी गावाची ग्रामसभा ही सार्वभौम–संस्था आहे ती पूर्णपणे नियंत्रण करू शकते. म्हणून तिच्या पूर्वसंमतीनेच सर्व कामे चालतील. किंवा काही कामे आगाव केली तर त्या कामांना ह्या ग्रामसभेची संमति मिळवावी लागेल. मंत्रीमंडळ आणि असेंब्लि ह्यांचे जे नाते असते तेच ह्या ग्रामसभेचे व पंचायतीचे राहील त्यामुळे प्रत्येकाला आपल्या अडचणी ग्रामसभेत मांडता येतील. त्यासाठी वारंवार ग्रामसभा घ्यावी लागेल. ह्यामुळे प्रत्यक्ष लोकशाही कारभार गावात सुरू होईल."

"जिल्हापरिषद–पंचायत समित्या व ग्रामपंचायत अशी विकेंद्रित लोकतांत्रिक सत्तेची मालिका आहे. ह्यात ग्रामदानाने काही व्यत्यय येईल कां ? असाहि प्रश्न विचारला जातो.

कल्पना करा अेकाच गावाची ग्रामपंचायत आहे; आणि ते गाव ग्रामदान झाले.पंचायत समितीत (तालुका पंचायत) समजा ६० पंचायति (ग्राम) आहेत. त्यांचे दोन तीन गट पाडतात. त्यां २०।३० सरपंचांना पंचायत समितीच्या सदस्यत्वासाठी उभे राहता येते अशी घटना आहे. ग्राम पंचायतीच्या सरपंचाला पंचायतीच्या सदस्यत्वासाठी उमेदवार म्हणून उभे राहता येते. तेव्हा ग्रामसभेचा अध्यक्ष पंचायतीच्या सदस्यत्वासाठी उभा राहू शकेल. तोच न्याय जिल्हा परिषदेला लागू होतो. तेव्हां अेकाच गावाची ग्रामपंचायत असली तर फरक पडत नाही.

परंतु गट ग्रामपंचायत असली व अेक गाव ग्रामदान झाले आणि दुसरे झाले नाही तर ? किंवा दोन्ही गावांचे ग्रामदान झाले तर दोन्ही ठिकाणी अध्यक्ष होतील. तेव्हा पूर्वी अेका ग्रामपंचायतीतून अेकच मनुष्य उभा राहू शकत होता तेव्हा दोघांनाहि उभे राहता येईल कां ? हा प्रश्न विचाराधीन आहे."

### विनोबाजींचा पत्ता

C/o सर्वोदय कार्यालय
मगनवाडी, वर्धा

संपादक :–श्री. गोपाळराव काळे, श्री. बसंतराव बोंबटकर,
प्रकाशकः–श्री. वसंतराव बोंबटकर,
मुद्रकः–गो. भा. जोशी, भास्कर प्रेस, वर्धा.
स्वामित्वः–महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, मुंबई.

साम्ययोग दैनिक ता. १६-७-६४ अ.१०४ र.नं ए.न.२९५
विनोबा वार्ता, मगनवाडी, वर्धा ( म. राज्य)
श्री. ________ पत्ता

www.vinoba.in